# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल: rahuri.amfu@gmail.com

**९६) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०१.२०२२**

**जिल्हा : धुळे**

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०१/२०२२ ते २७/०१/२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२९/०१/२०२२ ते ०२/०२/२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.० | ३१.० | ३०.० | २४.० | २२.० | २३.० | २४.५ | कमाल तापमान (अं.से.) | २७ | २९ | ३० | २९ | २८ |
| ९.८ | १०.२ | ११.७ | ७.० | ४.७ | ३.२ | ३.० | किमान तापमान (अं.से.) | ११ | १२ | १३ | १२ | ११ |
| ०.० | १.० | २.० | १.० | १.० | १.० | १.० | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | १ | ० | ० |
| ८२.० | ८९.० | ६१.० | ७१.० | ८१.० | ८६.० | ८६.० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५८ | ६० | ६० | ५९ | ५८ |
| ०.० | ३१.० | ३७.० | ३२.० | ०.० | ३३.० | ४०.० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३९ | ४० | ४० | ३९ | ३८ |
| ३.६ | २.७ | ५.६ | ३.५ | २.१ | २.६ | २.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ५ | ४ | ४ | ३ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पिक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहील. |
| **सामान्य सल्ला** | | थंडीमध्ये पिकानाजमिनीतुन खताची मात्रा देवु नये कारण थंडीमध्ये मुळांची कार्यक्षमता कमी होते त्यामुळे सदरील खते पिकाना उपयोगी पडत नाही.<br>थंडीमध्ये आंतरमशागतीची कामे टाळावीत जेणे करुन जमिनीतील उष्णता टिकुन राहिल.<br>पिकावर कीटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी. |
| **संदेश** | | **गहू:** मावा व तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीस दिसून येताच १ ग्रॅम थायामिथॉक्झाम २५ डब्लू.जी. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **हरभरा** | **घाटे भरण्याची अवस्था** | ढगाळ वातावरणात हरभरा पिकामध्ये घाटे अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी फ्लुबेंडामाइड ४८ टक्के प्रवाही २.५ मिली किवा इमामेकटीन बेंझोएट ५% दाणेदार ४ ग्राम किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५% प्रवाही २ मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>कोरडवाहू पिकास पाणी देण्याची व्यवस्था नसल्यास पिक फुल अवस्थेत असताना २% युरियाची व घाट्यात दाणे भरताना २% पोटाशिअम नायट्रेटची (१३:०:४५) फवारणी करावी. |
| **रब्बी ज्वारी** | **दाणे भरण्याची अवस्था** | लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी १.५% क्विनॉलफॉस भुकटी किंवा ५% मेलॅथिऑन भुकटी २० किलो प्रति एकरी याप्रमाणात सकाळी वारा शांत असताना धुरळावी. |
| **गहू** | **फुलोर्याची अवस्था** | मावा व तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीस दिसून येताच १ ग्रॅम थायामिथॉक्झाम २५ डब्लू.जी. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **मका** | **कणसे सुटताना** | पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव पुन्हा दिसून आल्यास इमामेक्टीन बेन्झोएट ०.४ मिली प्रति लिटर पाण्यातून फवारावे. अळीचा प्रादुर्भाव लक्ष्यात येण्यासाठी प्रति एकरी चार कामगंध सापळे लावावेत. |
| **करडई** | **दाणे भरण्याची अवस्था** | मावा किडीच्या नियंत्रणासाठी १० मिली डायमेथोएट ३०% प्रवाही १० लीटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| **फळ पिके** | | थंडी पासून बचाव करणेकरीता फळ पिकाना संध्याकाळच्या वेळी पाणी द्यावे. |
| **पशुसंवर्धन** | | गुरांना रात्रीच्या वेळेस गोठ्यात बांधावे आणि थंडीपासून बचाव करण्यासाठी गोठा स्वच्छ व कोरडा ठेवावा.<br>थंडी पासुन संरक्षण करण्यासाठी निरोगी ठेवण्यासाठी जनावरांच्या आहारात प्रथिने आणि खनिजे यांची मात्रा वाढवा.<br>थंडीमध्ये जनावरांची उर्जेची गरज भागविण्यासाठी नियमितपणे जनावरांना खनिज मिश्रण,मीठ व गव्हाचा भरडा, गूळ इत्यादीचे मिश्रण योग्य प्रमाणे द्यावे.<br>सकाळच्या वेळी जनावरे चरण्यास सोडु नये. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल: rahuri.amfu@gmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | रात्रीच्या वेळी जनावरे उघड्यावर बाधु नये. |
| **कुक्कुटपालन** | | पक्ष्याच्या शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन उष्णता निर्माण करावी. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : २८.०१.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,**
**ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग,**
**मफुकृवि, राहुरी.**